विशेष दुरुस्ती, विस्तार व सुधारणा , पूर संरक्षक व दुरुस्ती,नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) कामांच्या प्रशासकीय मान्यतेची /सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव/अंदाजपत्रक राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती मार्फत शासनास सादर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक. २०१७/(५६६ /१७)/सिं.व्य.(कामे)
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १९/१२/२०१७

<u>वाचावे</u> : १) शासन परिपत्रक क्र. प्रमा-२०१३/(७८५/१३)/सिंव्य (कामे), दि. १/१/२०१५
२) शासन पत्र क्र.प्रमा - २०१३/(७८५/१३)सिंव्य(कामे) ,दि.४/६/२०१६
३) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१३/(४१५/१३)/सिंव्य (कामे) दि. १७/११/२०१६
४) शासन पत्र क्र.संकीर्ण २०१६/(३०५/१०४/२०१६)/जसं (आस्था),दि.१०/४/२०१७
५) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१६/(२७/२०१६)/लपा-२, दि. २६/५/२०१७

<u>प्रस्तावना</u> :-

उपरोक्त शासन निर्णय/परिपत्रक/पत्र यामधील सुचनांच्या अनुषंगाने विशेष दुरुस्ती/विस्तार सुधारणा/पूर संरक्षक कामे/ दुरुस्ती,नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) यांचे प्रशासकीय मान्यतेचे/सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव/अंदाजपत्रके शासन स्तरावर मंजुरीकरीता प्राप्त होत असतात. सदर प्रशासकीय मान्यता / सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव / अंदाजपत्रकाचे अवलोकन केल्यास असे निदर्शनास आले आहे की, सदर प्रस्ताव/ अंदाजपत्रकांची व त्यासोबतच्या तपासणी सुची, प्रपत्रे यांची प्रचलित शासन निर्णय/ परिपत्रके यांचे अधिन राहून वरिष्ठ क्षेत्रिय कार्यालयामध्ये तांत्रिक तपासणी/पडताळणी होत नसल्यामुळे शासन स्तरावर तांत्रिक तपासणी/ पडताळणी करीता बराच वेळ लागत आहे. तसेच शेरे पूर्ततेसाठी अंदाजपत्रके क्षेत्रिय स्तरावर पाठविल्यामुळे प्रस्तावांच्या मंजुरीस विलंब होत आहे. वारंवार सुचना करुनही त्याच त्रुटी इतर अंदाजपत्रकात झालेल्या दिसून येतात. वास्तविक शासन स्तरावर इतकी सखोल तांत्रिक तपासणी करणे शक्य नाही, केवळ धोरणात्मक स्वरुपातच तपासणी करुन मान्यता घेणे अपेक्षित असते. परंतु या त्रुटींमुळे मोठा कालपव्यय होतो व श्रमही वाढतात.

शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१६/(२७/२०१६)/लपा-२, दि. २६/५/२०१७ अन्वये सिंचन प्रकल्पांच्या विशेष दुरुस्ती/ देखभाल दुरुस्तीच्या रु. ५.०० कोटी पर्यंतच्या अनावर्ती कामांना प्रशासकीय (वित्तीय मंजूरी धरुन) मान्यता प्रदान करण्याचे अधिकार जलसंपदा विभागास प्राप्त असून रु. ५.०० कोटी पेक्षा अधिकच्या कामाबाबत वित्त व नियोजन विभागाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तसेच विस्तार व सुधारणा अंतर्गत प्राप्त सर्व प्रस्ताव जलसंपदा विभागामार्फत वित्त व नियोजन विभागास सादर होत असतात. त्यामुळे महामंडळ स्तरावरुन शासन स्तरावर प्राप्त प्रशासकीय मान्यता/सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावांच्या तांत्रिक तपासणीतील कालापव्यय कमी करुन विशेष दुरुस्ती/विस्तार सुधारणा/पूर संरक्षक कामे/ दुरुस्ती,नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) यांच्या

अंदाजपत्रकांच्या मान्यते मध्ये समानता व सुसुत्रता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

पूर्ण झालेल्या व सिंचन व्यवस्थापने अंतर्गत हस्तांतरीत झालेल्या मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांचे रु. २५ कोटी पेक्षा कमी किंमतीच्या विशेष दुरुस्ती/विस्तार सुधारणा/पूर संरक्षक कामे / दुरुस्ती,नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) यांच्या प्रशासकीय मान्यतेचे व सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे प्रस्तावांची राज्य तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय करीत असलेल्या छाननी प्रमाणे महामंडळस्तरावर छाननी करुन सदर छाननी अहवाल राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडून मुल्यार्पण (Vetting) करुन घ्यावेत. राज्य तांत्रिक सल्लागार समितीने मुल्यार्पण केलेले विशेष दुरुस्ती/विस्तार सुधारणा/पूर संरक्षक कामे/ दुरुस्ती,नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) यांच्या प्रशासकीय मान्यतेचे व सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव महामंडळाने सुस्पष्ट शिफारशीसह शासनास सादर करावे.

तसेच रु. २५ कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या विशेष दुरुस्ती/विस्तार सुधारणा/पूर संरक्षक कामे/दुरुस्ती,नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) यांच्या प्रशासकीय मान्यतेचे व सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्तावांबाबत राज्य तांत्रिक सल्लागार समिती मार्फ़त सविस्तर तपासणी करुन छाननी अहवालासहित सुस्पष्ट शिफ़ारशी असलेले प्रस्ताव शासनास सादर करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१२२७११५६४७२०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2017.12.27 12:01:21 +05'30'

(अ.अ.कपोले)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४. मा. सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.

७. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव.
८. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
९. प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१० सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सचिव (प्रकल्प समन्वय) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.महासंचालक,महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी)नाशिक.
१३. सर्व कार्यकारी संचालक, पुणे/नागपूर/जळगांव/औरंगाबाद/ठाणे
१४. सर्व मुख्य अभियंता व सहसचिव/उप सचिव जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवड नस्ती कार्यासन सिंव्य (कामे)